मनोरंजनासह प्रबोधनासाठी...

दैनिक


epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

**खिचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी**

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

• RNI No. MAHMAR/2011/40847 • वर्ष १३ वे • अंक ३१० वा • सोमवार, ता. १९ मे २०२५ • www.rayatsamachar.com • पाने ४ • मूल्य रु. ४.००




कर्नाटक किनाऱ्याजवळ ता. २२ मेच्या सुमारास कमी दाबाचे क्षेत्र तयार होऊन उत्तरेकडे सरकत आणखी तीव्र होण्याची शक्यता आहे. त्यामुळे १९ ते २५ मे दरम्यान कोकण, मध्य महाराष्ट्रातील लगतच्या घाट भागात तुरळक ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे- **मुंबई प्रादेशिक हवामान केंद्र**



## सरसंघचालक डॉ. भागवत यांनी घेतले साई समाधीदर्शन

**शिर्डी । कुलदीप कुलकर्णी**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी शिर्डी येथे साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेतले. रविवारी ता.१८ मे रोजी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ.मोहन भागवत यांनी शिर्डी येथे साईबाबा यांच्या समाधीचे दर्शन घेतले.

तसेच मंदिरात श्रींचे पाद्यपूजन केले. शिर्डी विमानतळ येथून नाशिकला जाण्यापूर्वी ते साई मंदिरात आले. मंदिर परिसरात आगमन होताच मुख्यकार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर, भिमराज दराडे यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी त्यांनी द्वारकामाई, समाधी मंदिर व गुरुस्थान येथेही दर्शन घेतले. साई मंदिरात संस्थान अधिकाऱ्यांनी श्रीसाई मूर्ती, श्रीसाईचरित्र, उदी प्रसाद आणि शाल श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार केला. यावेळी डॉ. भागवत यांनी आपल्या अभिप्रायात म्हटले, १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धानंतर भारताच्या नवोत्थानाचा पाया या नात्याने भारतभर समाजाचे प्रबोधन, अध्यात्म तत्व आणि व्यवहार या मूलभूत घटकाचे ज्या ईश्वरीय योजनेने झाले त्याचा एक भाग म्हणजे शिर्डीचे साईबाबा होत. देह त्यागानंतरही त्यांची तपस्या अनेकांना पथदर्शक ठरते ही प्रचिती आहे. अशा श्री बाबांचा समाधी मंदिराचा नित्यकार्य विकास व त्याचे नित्य उत्तम व्यवस्थापन करणाऱ्या सर्व कार्यकर्ता मंडळींचे कृतज्ञतापूर्वक धन्यवाद, अशा भावना व्यक्त केल्या. यावेळी सराला बेटाचे महंत रामगिरी महाराज यांनी डॉ. भागवत यांची भेट घेतली. यावेळी उत्तर नगर जिल्हा संघचालक किशोर निर्मळ उपस्थित होते.

## उड्डाणपुलाचे काम निकृष्ट- पालेकर

### गिरी ते पर्वरी उड्डाणपुलाचा सेगमेंट कोसळला; जिवीतहानी टळली

**पणजी । प्रतिनिधी**

गिरी ते पर्वरी दरम्यान उभारण्यात येणाऱ्या उड्डाणपुलाच्या कामाला सध्या वेग आला. मात्र काल दुपारी सुमारे १ वाजता एक सेगमेंट खांबावर चढवत असताना अचानक खाली कोसळला आणि त्याचा काही भाग तुटला. सुदैवाने, या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. घटना ज्यावेळी घडली त्यावेळी वाहतूक सुरूच होती. कामाच्या ठिकाणी उपस्थित असलेले कामगार सुरक्षित आहेत. मात्र या घटनेचा स्थानिकांनी मोठा धसका घेतला आहे.



कामाचा दर्जा बेताचाच असून दृष्टीआड घाईगडबडीत हे काम चालू असल्याची प्रतिक्रिया काही नागरिकांनी व्यक्त केली.

दुर्घटना केवळ तांत्रिक चुकीमुळे झाली की अन्य कारणामुळे याबाबत मात्र अजून स्पष्ट झालेले नाही. मात्र नागरिकांनी कंत्राटदार कंपनीला दोषी ठरवत या कामाच्या गुणवत्तेवर आणि प्रशासनाच्या देखरेखीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले. उड्डाणपुलासाठी सेगमेंट टाकण्याचे काम काही महिन्यांपासून सुरू असून आतापर्यंत २१ हून अधिक सेगमेंट यशस्वीरित्या बसविण्यात आले आहेत. मात्र आज दुपारी एक सेगमेंट खांबावर चढवत असताना तो अचानकपणे खाली कोसळल्याची घटना घडली. ही दुर्घटना ज्यावेळी घडली त्यावेळी वाहतूक पूर्णपणे सुरू होती. घटनास्थळी मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. सेगमेंटजवळून दोन्ही बाजूने सुमारे ७०० मीटर वाहतूक कोंडी होती. गिरी महामार्गावरून पणजीकडे जाणाऱ्या आणि तिथून येणाऱ्या वाहनांचा मोठा खोळंबा झाला. वाहतूक सुरळीत करण्यासाठी पोलिसांनी तत्काळ हस्तक्षेप देखील केला परंतु वाहतूक जास्त असल्याने तासभर ठप्प होती. उड्डाणपुलाचा स्लॅब कोसळल्याने आम आदमी पक्षाचे गोवा प्रदेशाध्यक्ष अमित पालेकर यांनी गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. या उड्डाणपुलाचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे असून त्यासाठी अत्यधिक कमिशन दर आकारण्यात आले आहेत,असा आरोप करत पालेकर यांनी सरकारवर जोरदार टीका केली. लोकांच्या सुरक्षेचा प्रश्न असताना एवढ्या हलगर्जीपणाने काम करण्यात आले आहे, हे अत्यंत चिंताजनक आहे, तत्काळ तांत्रिक तपासणी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणीही पालेकर यांनी केली आहे.







## शनिशिंगणापूर देवस्थान उत्पन्नात ५ कोटींची भर

**सोनई । विजय खंडागळे**

तीर्थक्षेत्र शनिशिंगणापूर देवस्थानच्या स्वमालकीच्या ६० व्यावसायिक गाळ्यांचे ११ महिन्यांच्या करारासाठी टेंडर लिलाव पार पडले. यामध्ये पानफुल, नारळ, हॉटेल, तेल विक्रीचा समावेश असून या व्यावसायिक गाळे लिलावातून शनिशिंगणापूर देवस्थानला पाच कोटी रुपयांचे उत्पन्न मिळणार आहे.

### कुंभमेळा भाविकांसाठी पैसे वापरावेत, जिल्हाधिकारी यांचे संकेत

या निधीचा वापर नाशिक कुंभमेळा पार्श्वभूमीवर भाविकांना सुविधा मिळण्यासाठी खर्च करण्यात यावा, असे जिल्हाधिकारी प्रत्येक देवस्थानला सूचित करत आहे.

### गाळ्यासाठी स्पर्धा

**शनिशिंगणापुरात शनि महाराजांच्या दर्शनासाठी राज्यातील भाविकांचा ओघ सुरू असतो. शनि अमावस्या, गुढीपाडवा तसेच दररोज भाविकांची वाढती गर्दी पाहता येथील व्यावसायिकांमध्ये गाळे घेण्यासाठी स्पर्धा आहे. देवस्थान ट्रस्टचे विश्वस्त मंडळ नियुक्तीबाबत पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व आ. विठ्ठलराव लंघे यांची सहमती एक्स्प्रेस कधी धावणार, याकडे शिर्डी साईबाबा संस्थान नियुक्तीनंतर आता कधीही अचानक मंडळ स्थापन होईल अशी चर्चा होताना दिसत आहे.**

तीर्थक्षेत्र शनिशिंगणापूर येथे देवदर्शनासाठी लाखो भाविकांची वाढती गर्दी लक्षात घेता, शनैश्वर देवस्थान मालकीचे व्यवसायिकांसाठी ६० गाळे उभारले. दर ११ महिन्यांनी या व्यावसायिक गाळ्यांची टेंडर पद्धतीने लिलावाद्वारे दिले जातात. एका गळ्यासाठी पन्नास हजार रुपये डिपॉझिट तसेच तेल लिलावासाठी तीस लाख रुपये डिपॉझिट आकारले आहे. या टेंडर लीलावासाठी २४९ व्यावसायिकांनी निविदा भरल्या. लिलावात मिळालेले गाळा रक्कम सात दिवसात न भरल्यास ती रक्कम देवस्थानकडे जप्त होते, हा नियम आहे. नारळ, तेल, पानफुल, हॉटेल आदी व्यवसायाची गाळे लिलावातून शनिशिंगणापूर देवस्थानला ११ महिन्याच्या लिलावातून तब्बल चार कोटी ९५ लाख रुपये उत्पन्न मिळाले. शनीमूर्तीवर हजारो लिटर तेल भाविक अर्पण करतात. हे तेल स्टोरेज टँकमध्ये साठवले जाते याच निर्माल्य तेलाचे दर ११ महिन्याला लिलावाद्वारे विक्री केली जाते. अर्पण केलेल्या निर्माल्य तेलासाठी ८८ रुपये किलोप्रमाणे टेंडर अहमदाबाद, गुजरात येथील नवकार प्रोसेस कंपनीने लिलाव घेतला.

## आनंद वाटल्याने अधिक वाढतो- डॉ. कळमकर

### श्री स्वामी समर्थ व्याख्यानमाला- अंतिम पुष्प

**पिंपरी । प्रदीप गांधलीकर**

सभोवतालच्या छोट्या छोट्या गोष्टीत आनंद आहे; पण तो शोधायची दृष्टी पाहिजे. तसेच आनंद वाटल्याने अधिक वाढतो, असे प्रतिपादन डॉ. संजय कळमकर यांनी श्री स्वामी समर्थ मंदिर प्रांगण, शिवतेजनगर, चिंचवड येथे शनिवारी ता. १७ मे रोजी केले. श्री स्वामी समर्थ सेवा प्रतिष्ठान आयोजित तीन दिवसीय श्री स्वामी समर्थ व्याख्यानमालेत आनंदी जीवनाच्या वाटा या विषयावरील अंतिम पुष्प गुंफताना संजय कळमकर बोलत होते. सर्जेराव भोसले अध्यक्षस्थानी होते; तसेच समन्वयक राजेंद्र घावटे, शैलेश मोरे, श्रीकांत करवले, सोपान खेडकर, विजय महल्ले, राजू वसुले, संजय काकड, सतीश भेंडे, सुनील कदम, श्री स्वामी समर्थ सेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष नारायण बहिरवाडे यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. नारायण बहिरवाडे यांनी प्रास्ताविकातून, दहा पुस्तकं वाचून मिळवलेले ज्ञान एका व्याख्यानातून सहजपणे प्राप्त होते म्हणून श्री स्वामी समर्थ सेवा प्रतिष्ठानच्या माध्यमातून या वर्षापासून व्याख्यानमालेचा प्रारंभ केला. प्रतिष्ठानमार्फत वर्षभर विविध आध्यात्मिक, सांस्कृतिक, सामाजिक आणि आरोग्यविषयक उपक्रम राबविण्यात येतात! अशी माहिती दिली. व्याख्यानापूर्वी, वयाच्या ६९ व्या वर्षी वीस दिवसांत महाराष्ट्रातील छत्तीस जिल्ह्यात दुचाकीवरून भ्रमंती करीत स्वच्छतेचा संदेश पोहोचवणाऱ्या यशवंत कन्हेरे यांचा विशेष सत्कार करण्यात आला.



डॉ. संजय कळमकर पुढे म्हणाले, जगातील १४२ देशांचे सर्वेक्षण करून आनंदी देशांची क्रमवारी जाहीर करण्यात आली. त्यामध्ये फिनलँड प्रथम क्रमांकावर होता; तर भारत १२६ व्या क्रमांकावर होता; परंतु विनोदाची अन् खेदाची बाब म्हणजे पाकिस्तान १०८ क्रमांकावर होता. त्यामुळे भौतिक समृद्धी म्हणजे आनंदी जीवन नव्हे. उलट जुन्या काळातील माणसे समाधानी होती. पूर्वी गरिबीतही आनंद, सुख, समाधान मिळत होते. आता विज्ञान तंत्रज्ञानाचा अतिरेक होत आहे. मोबाइल हे त्याचे दैनंदिन उदाहरण आहे. पुस्तक वाचनाची आवड, चांगले छंद आणि नाती जपल्याने जीवनातील आनंदाच्या अनेक वाटा गवसतील! प्रासंगिक विनोद, शाब्दिक विनोद, किस्से, दैनंदिन जीवनातील विसंगतीवर मार्मिक भाष्य करीत कळमकर यांनी श्रोत्यांना खळखळून हसवत प्रबोधन केले. राजेंद्र घावटे यांनी वक्त्यांचा परिचय करून दिला. दीपक पाटील, कल्याण वाणी, नंदकुमार शिरसाठ, प्रशांत पाटील, जितेंद्र छाबडा, किशोर थोरात, सागर मोरे, आर. व्ही. राणे यांनी संयोजनात सहकार्य केले. तेजस्विनी बडे यांनी सूत्रसंचालन तर सारिका रिकामे यांनी आभार मानले.

## कोपरगाव बस आगारास १५ नवीन बस लवकरच उपलब्ध

### माजी आमदार कोल्हे यांच्या पाठपुराव्याला यश

**कोपरगाव । किसन पवार**

माजी आ. स्नेहलता कोल्हे यांनी कोपरगाव एस.टी. आगारात बस संख्या कमी असल्याने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडे बीएस ६ मानकाच्या नवीन बसची मागणी केली होती. त्याची दखल घेऊन परिवहन मंत्री यांच्या निर्देशानुसार कोपरगाव आगाराला १५ नवीन प्रकारच्या बसेस टप्प्या टप्प्याने मिळणार असल्याचे कळविले. कोपरगाव तालुक्यातील अनेक ग्रामस्थ, विद्यार्थी, व्यापारी वर्ग आणि महिला प्रवासी दररोज एस.टी. वाहतुकीवर अवलंबून आहेत. मागील काही वर्षांमध्ये जुनी झालेली वाहने, त्यांच्या सतत बिघाडामुळे होणारा खोळंबा, तसेच प्रवाशांना बस उपलब्ध न होण्यामुळे निर्माण झालेली गैरसोय लक्षात घेऊन स्नेहलता कोल्हे यांनी हा प्रश्न मांडला होता. या मागणीस अनुसरून रा.प. महामंडळाने कोपरगाव आगारासाठी १५ नवीन बसेस जशा उपलब्ध होतील त्यानुसार लवकरच देण्याचे निश्चित केले. या बसेस आगारात दाखल झाल्यानंतर कोपरगाव बस आगारातील प्रवासीवर्गाची होणारी अडचण दूर होणार आहे. चालक आणि वाहक यांना देखील वारंवार जुन्या वाहनांच्या अडचणी व अपूर्णता याचा सामना करावा लागणार नाही, त्यामुळे चांगला निर्णय या माध्यमातून होणार आहे.



स्नेहलता कोल्हे यांनी ही मागणी मान्य केल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, रा.प. महामंडळाचे व्यवस्थापक यांचे आभार मानले असून, कोपरगावकर प्रवाशांसाठी हा निर्णय महत्त्वाचा व उपयुक्त ठरणार असल्याचे सांगितले आहे.



## एक राष्ट्र, एक कृषी व एक टीम म्हणून कृषी विभाग आता काम करेल

### कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांची घोषणा

**मुंबई । प्रतिनिधी**

आमचे शेतकरी हे मेहनती असून त्यांच्या घामाला, कष्टाला न्याय देण्यासाठी भारतातील कृषी क्षेत्रासाठी काम करणारे सर्व संशोधक, केंद्र सरकार, राज्य सरकार व सर्व संस्था एकत्र येऊन मिशन मोडवर काम करण्याची गरज आहे. एक राष्ट्र - एक कृषी व एक टीम म्हणून कृषी विभाग आता काम करेल, अशी घोषणा केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जलयुक्त शिवार क्षेत्रात दिलेल्या योगदानाचा कृषीमंत्र्यांनी केला गौरव केला. फडणवीस यांनी कृषी क्षेत्राच्या विकासाला चालना देण्यासाठी महाराष्ट्रात जलसंधारणाची जी कामे केली त्याला तोड नाही. जलयुक्त शिवार महाराष्ट्राला वरदान ठरले. संयम, धैर्य व निश्चयी वृत्तीने त्यांची कार्यशैली कोणत्याही आव्हानात डगमगली नाही, असे केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान म्हणाले.


## पंत महाराजांचा परममंगल विवाह सोहळा संपन्न

### श्रीपंत गुरुचरित्र पारायण बोधपीठास उत्स्फूर्त प्रतिसाद

**बेळगाव । श्रीकांत काकतीकर**

श्री दत्त संस्थान पंतबाळेकुंद्रीच्या वतीने ता.१० ते १३ मे दरम्यान आयोजित श्रीपंत गुरुचरित्र पोथीचे सामुदायिक वाचन व श्रीपंत बोधपीठ वासंती शिबिर भाविक भक्तांच्या अपूर्व उत्साहात पार पडले. दरम्यान मंगळवारी ता.१३ रोजी श्रीपंत महाराजांचा परममंगल विवाह सोहळा मोठ्या दिमाखात साजरा करण्यात आला. शिबिरातसहभागीसर्वशिबिरार्थींनी नामस्मरण, भजन, पालखी सेवा, बालगोपाळांचा विशेष कार्यक्रम तसेच महिलावर्गासाठी झालेल्या विशेष रंगतदार कार्यक्रमात उत्स्फूर्तपणे भाग घेतला. तसेच प्राप्तस्मरण, आरती असे विविध धार्मिक कार्यक्रम पार पडले. परममंगल विवाह सोहळा दरम्यान, मंगळवारी ता.१३ रोजी यमुनाक्का माऊली व श्रीपंत महाराज यांचा परममंगल विवाह सोहळा भावीकभक्तांच्या अपूर्व उत्साहात पार पडला.

डोळ्याचे पारणे फेडणाऱ्या या सोहळ्यात विवाह विधी व इतर धार्मिक कार्यक्रमांसह, मंगलाष्टके झाल्यावर विवाह सोहळा संपन्न झाला. या सोहळ्यानिमित्त मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई बरोबर भव्य शामियाना उभारण्यात आला होता. श्री दत्त संस्थानचे प्रमुख ट्रस्टी रंजन पंतबाळेकुंद्री यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम पार पडला. या सोहळ्यात धार्मिक व इतर कार्यक्रमांची रेलचेल झाली होती. सोहळ्यानंतर फटाक्यांची आकर्षक आतषबाजी करण्यात आली. सोहळ्यानंतर आयोजित महाप्रसादाचा शेकडो भक्तांनी लाभ घेतला. या तीन दिवशी कार्यक्रमात पालखी सोहळा पार पडला. सोहळ्यात विविध भागातून आलेल्या पुरुष व महिलांनी सहभाग घेतला. यावेळी बालगोपाळांच्या कला व बौद्धिक गुणांना वाव देणाऱ्या विशेष कार्यक्रमात बालगोपाळांनी आपल्या कलेची व बुद्धिमत्तेची चुणूक दाखवून दिली. महिलांच्या विशेष कार्यक्रमात महिला वर्गाचा उत्साह ओसंडून वाहणारा ठरला. तसेच भजनादी कार्यक्रम व लेझीम पथकाचे सादरीकरण उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. या तीन दिवशी कार्यक्रमास बेळगाव शहर परिसरासह कर्नाटक राज्याच्या विविध भागातून व महाराष्ट्रातून पंत भाविक भक्तांची उपस्थिती लक्षणीय होती.



# ऋतुजा फाऊंडेशनचे थॅलेसेमिया शिबीर उपक्रम स्तुत्य- नरेंद्रकुमार फिरोदिया



**अहमदनगर । आबिदखान**

जागतिक थॅलेसेमिया दिनाचे औचित्य साधून आयुष रूग्णालय येथे ऋतुजा फाऊंडेशन, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, हिमोफिलिया डे केअर सेंटर जिल्हा रूग्णालय, शांतिकुमारजी फिरोदिया मेमोरियल फाऊंडेशन, सक्षम संस्था आयोजित थॅलेसेमिया रूग्णांसाठी आणि जनजागृतीसाठी विविध तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले. शिबीरामध्ये थॅलेसेमिया रूग्णांची वार्षिक तपासणी एच.एल.ए. टायपिंग बोन मॅरो रजिस्ट्रेशन, रक्तदान, अवयवदान, नर्सिंग कॉलेजचे विद्यार्थी तसेच थॅलेसेमिया रूग्णांच्या नातेवाईकांची थैलेसिमिया मायनरची इलेक्ट्रोफोरोसिस तपासणी शिबिरांचे आयोजन करण्यात आले. एकूण २०० मायनरची तपासणी या शिबीरात करण्यात आल्या.

प्रास्ताविकात ॲड. डॉ. अंजली केवळ यांनी विविध शिबीरांची माहिती दिली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा न्यायाधीश चंद्रकांत बागल, यांनी ऋतुजा फाऊंडेशन आणि इतर सर्व संस्था एकत्र येऊन जिल्हा रूग्णालयाच्या मदतीने करत असलेल्या कामाचे कौतुक करुन असेच स्तुत्य कार्यक्रम वारंवार झाले पाहिजेत असे नमूद केले. सचिव जिल्हा विधी सेवा प्राधिकरण भाग्यश्री का. पाटील यांनी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाने गरजू थॅलेसेमिया व सर्वच रूग्ण आणि शासकीय यंत्रणा यांच्यातील सेतू व्हावे तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या उपक्रमाबद्दल आणि अनेक योजनांबद्दल माहिती दिली. कोणत्याही समस्येत न्यायालय सदैव रूग्णांच्या पाठीशी आहे. थॅलेसेमिया रूग्णांना दिव्यांगांचे कार्ड आता कायमस्वरूपी मिळणार आहे, हे सांगितले.

तेजस्विनी निराळे यांनी कायद्याविषयी माहिती देऊन कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या. प्रमुख पाहुणे म्हणून शांतीकुमारजी फिरोदिया मेमोरिअल फाऊंडेशनचे नरेंद्रकुमार फिरोदिया म्हणाले, जे जे पेशंट या आजारांनी ग्रस्त आहेत त्यांना धीर देण्याचे तसेच योग्य मार्गदर्शन देण्याचे आणि थॅलेसेमिया जनजागृतीचे काम ऋतुजा फाऊंडेशन उत्तम रीतीने करत असल्याचे सांगितले. पश्चिम महाराष्ट्र प्रांत संघचालक, राष्ट्रीय स्वंयसेवक संघाचे नानासाहेब तथा सुरेशअण्णा जाधव यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ दिव्यांगांसाठी काम करते आणि थॅलेसेमियामुक्त भारत करायचे स्वप्न असल्याचे नमूद केले. डॉ. नागोराव एस. चव्हाण, जिल्हा शल्य चिकीत्सक जिल्हा रूग्णालय यांनी थॅलेसेमियामुक्त भारत होण्यासाठी प्रत्येकाने लग्नाअगोदर थॅलेसेमियाची तपासणी केली पाहिजे असे सांगितले. डॉ. साहेबराव डवरे, अति. जिल्हा शल्य चिकित्सक जिल्हा रूग्णालय, श्रीधर बापट, पश्चिम महाराष्ट्र प्रांत उपाध्यक्ष, सक्षम संस्था यांनी सक्षमची माहिती दिली. तसेच नोव्हेंबर महिन्यात राष्ट्रीय अधिवेशन असल्याने सर्व दिव्यांगांनी उपस्थित राहण्यास सांगितले. यावेळी अशोक जव्हेरी, प्रांत कार्यालय प्रमुख, सक्षम संस्था पुणे, डॉ.राजीव चिटगोपीकर, अध्यक्ष, सक्षम संस्था, डॉ. मनोज घुगे, व्यवस्थापकीय अधिकारी जिल्हा रूग्णालय, महेश केवळ, संस्थापक ऋतुजा फाऊंडेशन, डॉ.आशिष इरमल, जिल्हा समन्वयक जिल्हा रूग्णालय, सुनिल जगदाळे, कोषाध्यक्ष सक्षम संस्था, कु. ऋतुजा केवळ, उपाध्यक्षा ऋतुजा फाऊंडेशन, रेखा चुत्तर, खजिनदार ऋतुजा फाऊंडेशन, छाया जाधव, अधिसेविका , महेश जोगदंड, भौतिकोपचार तज्ज्ञ, अविनाश कराळे, समुपदेशक आदी शिबीरास उपस्थित होते.

शिबीराच्या यशस्वीतेसाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, हिमॅटॉलॉजि डे केअर सेंटर, जिल्हा रूग्णालय, शांतीकुमारजी फिरोदिया मेमोरिअल फाऊंडेशन, सक्षम संस्था तसेच डॉ. स्वाती कराड, डॉ.विलास मढीकर, सुनिल महानोर, रामदास शेवाळे, सुर्यकांत केवळ, मंगेश केवळ, महेश राहींज, ऋषीकेश केवळ, अशोक तोरडमल आणि सर्व थॅलेसेमिया योद्धे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. वर्षा रोडे पाठक यांनी सूत्रसंचालन तर ऋतुजा केवळ यांनी आभार व्यक्त केले.

# डिएसपी चौकासह सिग्नलवर भीक मागण्यास बंदीची चर्मकार विकास संघाची मागणी

## जिल्हा पोलीस अधीक्षकांना निवेदन

**अहमदनगर । प्रतिनिधी**

शहरात दिवसेंदिवस वाढत असलेल्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर चर्मकार विकास संघाच्या वतीने शहरातील अवजड वाहनांची वाहतूक पूर्णपणे बंद करण्याची व सिग्नलवर भीक मागणाऱ्यांवर बंदी आणण्याची मागणी करण्यात आली आहे. या मागणीसाठी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष संजय खामकर आणि शहर जिल्हाध्यक्ष विनोद कांबळे यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला यांची भेट घेऊन मागणी केली. यावेळी अरुण गाडेकर, संतोष कानडे, रुपेश लोखंडे, संतोष कांबळे, दिलीप कांबळे आदी उपस्थित होते.

त्यांनी म्हटले आहे की, अहिल्यानगर शहरात सध्या काँक्रीटीकरांच्या माध्यमातून अनेक ठिकाणी मजबूत रस्त्यांचे काम सुरू असून, नव्याने उघडलेल्या रस्त्यांचे व जनतेचे स्वरक्षण महत्त्वाचे आहे सध्या वाहनांची वर्दळ वाढली आहे. विशेषतः अवजड वाहने भरधाव वेगाने धावत असल्याने अनेक वेळा अपघात घडत आहेत. काही अपघातांत निष्पाप नागरिकांचे जीव गेले असून, नुकताच प्रेमदान चौकात मोठ्या अवजड वाहनाचा घडलेला एक मोठ्या अपघात सुदैवाने जीवितहानी टळल्याने चर्चे चा विषय ठरला आहे.

शहरातील चांगल्या रस्त्यांची अवस्था अवजड वाहनांमुळे खराब होऊ नये म्हणून नगरकरांनी काळजी घेणे महत्त्वाचे असून, नागरिकांच्या सुरक्षेसाठी शहरातून या वाहनांची दिवसा व रात्रीची वाहतूक पूर्णपणे बंद करण्याची गरज आहे. शहरातील दुसरा गंभीर मुद्दा म्हणजे सिग्नलवर लहान मुले व महिलांकडून भीक मागणे हा असून, डीएसपी चौक व इतर सिग्नलवर ही मंडळी प्रवाशांना त्रास देत असून, सिग्नल सुरू झाल्यावरही रस्त्यावरून हटत नाहीत. दिवसभर भीक मागणाऱ्या महिला सोबत लहान मुलांना घेऊन फिरत असतात, या लहान मुलांचे भविष्य अंधारमय होत आहे. वाहतुकीला अडथळा निर्माण होतोच, शिवाय अपघाताची शक्यता देखील वाढत आहे. काहीजण वस्तू विक्रीच्या नावाखाली जबरदस्ती करताना दिसतात. ही मंडळी नेमकी कोठून येतात, कुठे राहतात याचा शोध घेणे अत्यावश्यक असल्याचे निवेदनात म्हटले आहे. शहरात शिस्तबद्ध वाहतुकीसाठी, नागरिकांच्या सुरक्षेसाठी शहरातील अवजड वाहनांची वाहतूक पूर्णपणे बंद करण्याची व सिग्नलवर भीक मागणाऱ्यांवर बंदी आणण्यासाठी पोलीस प्रशासनाने तातडीने पावले उचलावीत, अशी मागणी चर्मकार विकास संघाच्या वतीने करण्यात आली आहे.




# रात्रशाळेतील विद्यार्थ्यांची यशस्वी भरारी अभिमानास्पद- प्रा. शिरीष मोडक

## दहावीचे चार विद्यार्थी राज्य गुणवत्ता यादीत; दीक्षा गवळी-गायकवाड रात्रशाळेतून राज्यात प्रथम

**अहमदनगर । प्रतिनिधी**

हिंद सेवा मंडळ संचलित ज्युनियर कॉलेज भाई सथ्था नाईट हायस्कूलच्या एचएससी १२ वी बोर्डाच्या परीक्षेत कला व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. तर इयत्ता दहावीच्या बोर्डाच्या परीक्षेतील रात्रशाळेच्या गुणवत्ता यादीत ४ विद्यार्थिनींनी स्थान मिळवले. दिवसभर काम करुन रात्री शिक्षण घेणाऱ्या या होतकरु विद्यार्थ्यांनी आपल्या जिद्दीने गुणवत्ता सिध्द केली.

मासूम संस्था (मुंबई) यांच्या वतीने राज्यातील रात्रशाळांचे इयत्ता दहावी मधील प्रविष्ट सर्व विद्यार्थ्यांचे मूल्यांकन करण्यात येते. राज्यातील रात्रशाळांमधून प्रविष्ट विद्यार्थ्यांमधून टॉप टेन (१०) विद्यार्थी निवडण्यात येतात यामध्ये चार विद्यार्थी भाई सथ्था नाईट हायस्कूलचे आहेत. दीक्षा गवळी-गायकवाड (८६.८० %) हिने रात्रशाळेतून राज्यात प्रथम येण्याचा बहुमान पटकाविला आहे. मंदा भोराडे-पवार (७६.८० %) यांनी राज्यात पाचवा तर इशिता भोर व जयश्री वैरागर-वाघमारे (७४.४० %) या दोन्हींनी आठवा क्रमांक मिळवला आहे. या गुणवंत विद्यार्थिनींचा संस्थेच्या वतीने भाई सथ्था नाईट हायस्कूलमध्ये सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष प्रा. शिरीष मोडक, ज्येष्ठ मार्गदर्शक अजितशेठ बोरा, शालेय समितीच्या चेअरमन प्रा.ज्योतीताई कुलकर्णी, माजी चेअरमन डॉ. पारस कोठारी, नाईट हायस्कूलचे प्राचार्य सुनील सुसरे आदी उपस्थित होते.

ज्योतीताई कुलकर्णी म्हणाल्या की, शिक्षणाने नुसती डिग्री मिळत नाही, तर माणसाचा विचार प्रगल्भ होतात. विचार प्रगल्भ झाल्यास तुमच्या वागण्या-

### भाई सथ्था नाईट हायस्कूलच्या विद्यार्थ्यांचा दहावी,बारावी बोर्डाच्या परीक्षेतील गुणवंतांचा सन्मान

बोलण्यात बदल होतो आणि तो विचार तुम्हाला जीवनात पदोपदी निर्णय घेण्यास सक्षम बनवतो. म्हणून शिक्षण फक्त नोकरीसाठी नसून, जीवन घडविण्याचे साधन असल्याचे त्यांनी सांगितले.

शिरीष मोडक म्हणाले की, रात्र शाळेतील महिला विद्यार्थिनींनी उत्तम गुण मिळवणं ही साधी गोष्ट नाही, तर शिक्षणात मोठा खंड पडल्यावर पुन्हा अभ्यासाकडे वळणं हा एक धाडसी निर्णय असतो. घरातील जबाबदाऱ्या, कौटुंबिक अडचणी, सामाजिक बंधनं या सगळ्यांवर मात करत महिला स्वत:ची गुणवत्ता सिध्द करत आहेत. जेंव्हा शिक्षण घेण्याचा दृढ निश्चय घेतला जातो, तेंव्हा यश निश्चितच मिळते. या यशामागे केवळ विद्यार्थिनींचा दृढनिश्चय नाही, तर शिक्षकांनी दिलेले समर्पित मार्गदर्शनही तितकंच मोलाचं आहे. राज्यातील रात्र शाळेत टॉप १० मध्ये ४ विद्यार्थिनींचा समावेश असणं हेच शिक्षकांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे यश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

डॉ. पारस कोठारी म्हणाले की, रात्र शाळेत शिक्षक तळमळीने आणि समर्पणाने गुणवत्तापूर्ण शिक्षण देतात. कठीण परिस्थितीतही गुरूंनी केलेले मार्गदर्शन हेच विद्यार्थ्यांच्या यशामागचं खरं कारण असतं. म्हणूनच रात्र शाळेतील यश हे खऱ्या अर्थाने गुरूंचेच आहेत. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे त्यांनी अभिनंदन केले. तर बारावीनंतर पुढील शिक्षणासाठी सारडा महाविद्यालयात प्रवेश घेण्याचे आवाहन केले. सर्व यशस्वी विद्यार्थी-विद्यार्थिनींचे व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले तसेच वर्षभर शैक्षणिक मदत करणाऱ्या मासूम संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी निकिता केतकर, संचालक कमलाकर माने, युवराज बोराडे व एसएससी प्रमुख शशिकांत गवस, गुरुप्रसाद पाटील यांचे प्राचार्य सुनील सुसरे यांनी आभार मानले व शैक्षणिक वर्ष २०२५-२६ यावर्षीचे इयत्ता आठवी ते बारावी कला, वाणिज्य शाखेसह नवीन देणे सुरू झाल्याची माहिती सर्व विद्यार्थी, पालकांना दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैशाली दुराफे यांनी केले. आभार अमोल कदम यांनी मानले. ज्युनियर कॉलेज भाई सथ्था नाईट हायस्कूलचा १२ बोर्डाच्या परीक्षेचा निकाल पुढीलप्रमाणे:- कला शाखा प्रथम- स्वाती दुंनगु-गोंधळी (६५.५०%) द्वितीय- प्रशांत भिसे (६२.५० %)तृतीय- ऋतुजा दौंड-गवळी (६२-१७ %) वाणिज्य शाखा प्रथम- वैशाली ओमासे-आंधळे (५६.५०%) द्वितीय- मयुरी जाधव-कराळे (५२.३३%) तृतीय- राकेश अष्टेकर (५०.३३%) सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेचे मानद सचिव संजय जोशी, कार्याध्यक्ष डॉ. रमेश झरकर, जेष्ठ मार्गदर्शक ब्रिजलाल सारडा व माजी कार्याध्यक्ष अनंत फडणीस यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या, या कार्यक्रमाप्रसंगी महादेव राऊत, शरद पवार, मंगेश भुते, अशोक शिंदे, कैलास करांडे, अनुराधा दरेकर, अनिरुद्ध देशमुख, अनिरुद्ध कुलकर्णी, अविनाश गवळी, मनोज कोंडेजकर, संध्या डोईफोडे, मंगल बोरुडे, भाग्यश्री चरकू आदींसह पालक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिबिर म्हणजे भक्ती आणि शक्तीचा योग्य संगम – मुळे

## गीता परिवारच्या बालसंस्कार शिबिराच्या समारोप

**अहमदनगर । प्रतिनिधी**




शिबिर म्हणजे भक्ती आणि शक्तीचा योग्य संगम गीता परिवारच्या वतीने आयोजित बालसंस्कार शिबिराच्या समारोप कार्यक्रमात अध्यक्षस्थानावरून बोलताना राजाभाऊ मुळे यांनी प्रतिपादन केले. यावेळी प्रमुख पाहुण्या डॉ. रेणुका पाठक उपस्थित होत्या. त्या म्हणाल्या की, बाल वयात विद्यार्थ्यांना योग्य संस्कार मिळाले तर ते देश पुढे घेऊन जाण्यासाठी अत्यंत उपयोगी ठरतात, असे विद्यार्थी भारताची संस्कृती टिकून ठेवतील आणि असे विद्यार्थी तयार करण्याचं काम गीता परिवार मोठ्या प्रमाणात करत आहे. उत्तम आरोग्यदायी आहार कसा असावा, या विषयीही त्यांनी मार्गदर्शन केले. गीता परिवाराचे शहर अभिभावक नंदलालजी मणियार यांनी चारित्र्यवान, कार्यकुशल, आत्मनिर्भर, श्रद्धावान, सत्कर्मरत, भावी पिढी निर्माण करण्यासाठी भारतीय ऋषीप्रणीत संस्कार बालकामध्ये रूजवणे महत्वाचे आहे, असे मत मांडले. यावेळी जिल्हाध्यक्ष सुनंदा सोमानी यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करत असताना सांगितले की, स्वामी गोविंददेव गिरी महाराज यांनी स्थापन केलेल्या गीता परिवाराचा डॉ. संजय भैय्या मालपाणी यांनी भारतातच नाही तर विदेशातही विस्तार केला. यावर्षी येथे केंद्रांची संख्या सहा करण्यात आली होती. लहान वयोगटातील पहिली ते तिसरी या गटालासुद्धा मोठ्या प्रमाणात विद्यार्थी प्रतिसाद मिळाला. गीता परिवारा सोबत कार्यकर्ता म्हणून कार्य करण्याची इच्छा असेल तर उपस्थित पालक नाव नोंदवु शकता, अशी सुचना त्यांनी केली. सेक्रेटरी सोमनाथ नजान, उपाध्यक्षा प्रतिभा बजाज, कोषाध्यक्षा अलका नावंदर हे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून झाली. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी उन्हाळी सुट्टीत गीता परिवाराच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी संस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले. शहरात सहा विविध ठिकाणी आयोजित या संस्कार वर्गाचा सव्वा दोनशे विद्यार्थ्यांनी लाभ घेतला. या संस्कार वर्गात विद्यार्थ्यांना श्लोक, स्तोत्र, देशभक्तीपर गाणी, भजनं, भगवद्गीता शिकवण्यात आली. संस्कारक्षम कथा सांगितल्या, मुलांना संस्कार वर्गाची गोडी लागावी यासाठी खेळ, क्राफ्ट, जादूचे प्रयोग, वैज्ञानिक प्रयोग यांची मदत घेतली गेली. यावर्षी शिबिरामध्ये ज्ञानेंद्रिय संवर्धन यावर विशेष भर होता. समारोप कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी शिबिरात शिकवल्या गेलेल्या या सगळ्याचे सादरीकरण केले. सगळ्या सहा केंद्राच्या विद्यार्थ्यांनी रामायण संकल्पनेवर आधारित प्रस्तुती सादर केल्या. एकापेक्षा एक बहारदार प्रस्तुतीने उपस्थित प्रेक्षकांची मने जिंकली. पालकांनी मनोगत व्यक्त करताना सांगितलं की संस्कार वर्गात तुम्ही घेतलेल्या स्पर्धांची तयारी करताना मुलांचा मोबाईलचा वेळ कमी तर झालाच पण त्यांना भारतीय संस्कृती कडे वळण्यासाठी दिशादर्शन ही मिळालं. असे उपक्रम सातत्याने आयोजित व्हायला हवे, अशी अपेक्षाही पालकांनी व्यक्त केली. संस्कार वर्गाच्या कालावधीत विविध स्पर्धा संपन्न झाल्या.


रयत समाचार Classified छोटी जाहिरात

छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल

आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक

**भाड्याने देणे**

परिचय हॉटेलजवळ, बालिकाश्रम रोडवर कॉर्पोरेट ऑफिस, बँक, शोरूम, क्लिनिक आदींसाठी ८०० स्क्वेअर फुटाचे दोन मजले बांधलेली जागा भाड्याने देणे आहे.

- संपर्क -

८८८८३४७४११

निसार Art

सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट

7020356335 | 9860830016

पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.



मे. रुपाली एजन्सी

फुड प्रॉडक्ट मटेरियल सप्लायर्स

राधिका लॉजजवळ, तापकीर लेन, आडत बाजार, अहमदनगर - ४१४००१.

(०२४१) २३४३०६०, ९८२२८४३०६०

ई-मेल - rupaliagency@gmail.com

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!

कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द

जगदंबा टी सेंटर

चहा, कॉफी, लेमन टी

शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर

शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर

प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे

97655 58585

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा


हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ, 7774001800, समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा, 9373021584, गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी - गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफिसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक, 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)




# आ.राजळेंच्या पुढाकाराने ग्रामीण विभागातील भव्य रॅली

**पाथर्डी | शहर प्रतिनिधी**

नागरिकांच्या सहभागातून ऑपरेशन सिंदूरच्या यशाबद्दल व देशाच्या सैनिकांविषयी देशवासीयांच्या कृतज्ञता युक्त सद्भावना व्यक्त करण्यासाठी आयोजित तिरंगा रॅलीला शहरवासीयांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. देशप्रेमाच्या जोशपूर्ण घोषणांनी वातावरण पूर्णपणे भारावल्यासारखे झाले. आमदार मोनिका राजळे यांच्या पुढाकाराने रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी साडेनऊ वाजण्याच्या सुमारास बाजारतळावरून रॅलीला प्रारंभ करण्यात आला. यावेळी माजी खासदार डॉ.सुजय विखे, आ. मोनिका राजळे, माजी नगराध्यक्ष अभय आव्हाड, भाजपा जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग, तालुकाध्यक्ष धनंजय बडे, तहसीलदार डॉ.उद्धव नाईक, पालिका मुख्याधिकारी संतोष लांडगे, पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे, हिंदू रक्षा मंचचे नाना पालवे, महिला आघाडीच्या ज्योती शर्मा, काशीबाई गोल्हार, माजी सैनिक संघटनेचे गोवर्धन गर्जे, रॅलीचे दक्षिण जिल्हा संयोजक सुभाष गायकवाड आदींसह विविध संस्थांचे पदाधिकारी, पक्ष संघटनेचे कार्यकर्ते, सामाजिक, स्वयंसेवी, संस्थांचे पदाधिकारी, व्यापारी संघटना सदस्य आदी मोठ्या संख्येने सहभागी झाले. राष्ट्रीय सेवा योजना, एनसीसी, महिला बचतगट पदाधिकारी, रॅलीमध्ये सहभागी झाल्याने भव्यता वाढली. सैनिक, भारत माता अशा वेशभूषेमधील विद्यार्थी नागरिकांचे लक्ष वेधून घेत होते. विविध चौकांमध्ये देशभक्तीपर गाणे वाजवण्यात आली. रॅली पाहण्यासाठी रस्त्याच्या दुतर्फा नागरिकांनी गर्दी करत प्रोत्साहन दिले. माजी सैनिकांचा सन्मान मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. मिरवणूक मार्गावर खाटेर परिवारच्या वतीने पिण्याचे पाणी पुरविण्यात आली. मंत्री परिवाराच्या वतीने माजी सैनिक, एनसीसी कॅप्टन, प्रशासन प्रतिनिधी व शासन प्रतिनिधी यांचा सन्मान करण्यात येऊन रॅलीवर पुष्पवृष्टी करण्यात आली. वनदेव मॉर्निंग वॉक ग्रुपच्या सदस्यांनी रॅली मार्गावर विशेष सहकार्य केले. तालुका खरेदी विक्री संघाच्या वतीने अध्यक्ष संदीप पठाडे व सर्व संचालकांनी रॅलीतील सहभागी सर्वांना अल्पोपहार वितरण केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक माजी नगराध्यक्ष डॉ.मृत्युंजय गर्जे, सूत्रसंचालन राजीव सुरवसे तर आभार मोनिका राजळे यांनी मानले. नगर ग्रामीण विभागातील सर्वाधिक भव्य रॅली म्हणून प्रमुख पाहुण्यांनी भाषणातून कार्यक्रमाच्या आयोजनाबद्दल कौतुकाने उल्लेख केला.

# महात्मा फुले विद्यालयाची गायत्री देशमुख तालुक्यात प्रथम

## अगस्ति एज्युकेशन संस्थेने निकालाची परंपरा राखली

**अकोले | सतीश पाचपुते**






श्री अगस्ति एज्युकेशन सोसायटीच्या सर्वच माध्यमिक विद्यालयांचा एसएससी परीक्षा निकाल नेत्रदीपक लागला असून संस्थेच्या महात्मा फुले विद्यालय सुगाव बु।। विद्यालयाने निकालाची परंपरा राखत विद्यालयाची विद्यार्थीनी गायत्री महेंद्र देशमुख हिने ९८.६० गुण मिळवत तालुक्यात प्रथम येण्याचा मान मिळवला. विद्यालयाचा शेकडा निकाल १०० टक्के लागला असून तालुक्यात प्रथम, तृतीय, चतुर्थ येण्याचा बहुमान महात्मा फुले विद्यालयास मिळाला असून संस्थेच्या विविध विद्यालयातील विद्यार्थी तालुक्यात पहिले पाच क्रमांक मिळवून संस्थेचे संस्थापक सेक्रेटरी गुरुवर्य बा.ह. नाईकवाडी तथा बाबा यांनी सुरू केलेली निकालाची परंपरा कायम राखण्यात यशस्वी ठरले. तर महात्मा फुले विद्यालयाच्या यशात बहुमोल कामगिरी करून विद्यालयात प्रथम गायत्री महेंद्र देशमुख ९८.६०, द्वितीय वाकचौरे संस्कृती सुनिल हिने ९५.६०, तृतीय श्रुती ज्ञानेश्वर शिंदे ९५.२०, चतुर्थ ईश्वरी राजेंद्र पवार ९४.८० व पाचवा क्रमांक गौरी किरण भांगरे ९२.२० टक्के गुण मिळवले. तालुक्यात तृतीय क्रमांक मिळविण्याचा याच विद्यालयातील संस्कृती सुनिल वाकचौरे तर तालुक्यात चतुर्थ श्रुती ज्ञानेश्वर शिंदे हिने गुण प्राप्त करत निकालाचा उच्चांक गाठून बहुमान मिळवला. संस्थेच्या व्यवस्थापनाने सुरुवातीपासून एकाचवेळी एसएससी परीक्षेच्या दृष्टीने केलेले सुयोग्य नियोजन, सराव, तज्ज्ञ विषय शिक्षकांचे मार्गदर्शन आदी बाबींमुळे संस्थेच्या सर्वच विद्यालयांचा निकाल अत्यंत समाधानकारक लागला असल्याने सर्वत्र कौतुकाचा वर्षाव होत आहे. तर मागील वर्षी महात्मा फुले विद्यालयाची विद्यार्थीनी मुलींमध्ये तालुक्यात प्रथम व अगस्ति विद्यालयाचा विद्यार्थी तालुक्यात प्रथम क्रमांक प्राप्त झाला होता. सातत्याने एसएससी परीक्षेत संस्थेच्या विविध विद्यालयातील विद्यार्थी तालुक्यात अग्रस्थानी असतात हे विशेष.गुरुवर्य बाबांच्या पश्चात दिवंगत संस्थेच्या सेक्रेटरी दुर्गाबाई नाईकवाडी तथा आई यांनी गुणवत्तेच्या दृष्टीने सातत्याने प्रयत्न केले व मार्गदर्शन केले. महात्मा फुले विद्यालयाची विद्यार्थीनी गायत्री देशमुख हिने गुणांचा उच्चांक गाठत कला, क्रीडा, आदी क्षेत्रात आपले नैपुण्य सिद्ध करत वडील डिश टिव्ही व इलेक्ट्रॉनिक व्यवसायात असल्याने घरची परिस्थिती अत्यंत प्रतिकूल असूनही आई वडील यांची शिकविण्याची दुर्दम्य इच्छा आणि गायत्रीची मेहनत करण्याची उर्मी यामुळे तसेच शिक्षकांचे वेळोवेळी असलेले मार्गदर्शन यामुळे तालुक्यात तिने प्रथम येत एक नवा इतिहास निर्माण केला असल्याची भावना परिसरातून व्यक्त होत आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थी केवळ शिक्षकांच्या अध्यापनावर अवलंबून असल्याने विद्यालयाचा निकाल अत्यंत सुंदर लागल्याचे बोलले जाते. या यशाबद्दल संस्थेच्या सेक्रेटरी शैलजा पोखरकर अध्यक्षा माधुरी वाकचौरे, कार्याध्यक्ष शिरीष नाईकवाडी, सतीश नाईकवाडी, संदीप नाईकवाडी, सुगावच्या सरपंच डॉ.अनुप्रीता शिंदे, उपसरपंच महेश देशमुख, ग्रामपंचायत सर्व सदस्य, वाशेरे, मनोहरपूर ग्रामपंचायत, शालेय व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी, पंचायत समिती शिक्षण विभाग व पालकवर्ग यांचेकडून विद्यालयाचे मुख्याध्यापक सिताराम पाथवे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारीवर्ग यांचेवर अभिनंदनाचा होत आहे.

# शेतकऱ्यांच्या शेतमालाला हमीभाव व निर्यातीचा खात्रीशीर पर्याय उपलब्ध करणार – पावसे

## भाजीपाला संस्थेच्या अध्यक्षपदी पावसे तर उपाध्यक्षपदी गडाख

**संगमनेर | नितीनचंद्र भालेराव**

तालुक्यातील देवगड कृषी विकास फळे व भाजीपाला खरेदी विक्री सहकारी संस्था हिवरगाव पावसाच्या अध्यक्षपदी बाबासाहेब पावसे तर उपाध्यक्षपदी मच्छिंद्र गडाख यांची बिनविरोध निवड झाली. या निवडीची प्रक्रिया निवडणूक निर्णय अधिकारी सहाय्यक सहकार अधिकारी उपनिबंधक सहकारी संस्था संगमनेर प्रदीप वीरनारायण यांच्या अध्यक्षतेखाली झाली. नवनियुक्त संचालक मंडळातून अध्यक्ष व उपाध्यक्ष निवड करण्याचे ठरल्यानुसार बाबासाहेब यादवराव पावसे यांचा अध्यक्षपदासाठी एकमेव अर्ज दाखल झाला. त्यामुळे निवडणूक निर्णय अधिकारी यांनी बाबासाहेब पावसे यांची संस्थेच्या अध्यक्षपदी बिनविरोध निवड जाहीर केली. तसेच उपाध्यक्ष पदासाठी एकमेव अर्ज आल्याने मच्छिंद्र काशिनाथ गडाख यांची उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली. नवनियुक्त अध्यक्ष व उपाध्यक्ष यांच्या निवडीचे स्वागत करत मावळते अध्यक्ष तथा संस्थापक यादवराव पावसे आणि उपाध्यक्ष वृक्षमित्र गणपत पावसे, भाजपा माजी तालुकाध्यक्ष काशिनाथ पावसे, तंटामुक्ती समिती अध्यक्ष व संस्थेचे संचालक डॉ.विजय पावसे, संचालक नितीनचंद्र भालेराव, सरपंच सेवा संघाचे राज्याध्यक्ष तथा संचालक रोहित पवार, रविंद्र पावसे, संचालक दशरथ ढोकरे, भाऊसाहेब घोलप, नवनाथ कोल्हे, कैलास पावसे, नितीन शिरसाट, सुरेश गडाख, सुनिता पावसे, सविता पावसे आदींसह संस्था संचालक मंडळ, सर्व संस्था पदाधिकारी व ग्रामस्थांनी अभिनंदन केले. तसेच देवगड कृषी विकास फळे व भाजीपाला खरेदी विक्री सहकारी संस्थेमार्फत स्थानिक शेतकऱ्यांचा उत्पादित विक्रीसाठी फळे व भाजीपाला संकलित करून राज्यातील व त्यासाठी राज्याबाहेरील, शहरी बाजारपेठ उपलब्ध करून देणार आहे. देशातील तसेच राज्यातील मोठ्या लोकसंख्येचे शहरांमध्ये भाजीपाल्याची खरेदी विक्री करणाऱ्या व्यापारी कंपन्याच्या सहकार्याने शेतकऱ्यांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्यात येणार. या माध्यमातून शेतकऱ्यांना रास्त दर व हमी भाव मिळेल, शेतकऱ्यांना सुरक्षित व संरक्षित बाजारपेठ उपलब्ध होईल. शेतकऱ्यांच्या मालाचे जागेवर संकलन केले जाईल तसेच स्थानिक पातळीवर विविध संकलन केंद्र सुरू करण्यात येणार आहे. तसेच शासनाच्या कृषी व आत्मा, सहकार व पणन विभागाच्या मार्फत विविध योजनाचा लाभ शेतकऱ्यांना संस्थेमार्फत मिळवून देऊ, असे नवनियुक्त अध्यक्ष बाबासाहेब पावसे यांनी सांगितले.




# संजीवनी इंजिनिअरींगच्या तीन विद्यार्थ्यांना वार्षिक पॅकेज २७ लाखांवर– अमित कोल्हे

## बहुराष्ट्रीय वित्तीय कंपनीमध्ये नऊ अभियंत्यांना नोकरीची संधी

कोपरगाव | किसन पवार






संजीवनी इंजिनिअरींग कॉलेजच्या टी अँड पी विभागाच्या व कॉम्प्युटर इंजिनिअरींग आणि इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी विभागातील विद्यार्थ्यांच्या बहुराष्ट्रीय वित्तीय कंपनीने घेतलेल्या मुलाखतींमध्ये तीन विद्यार्थ्यांची प्रत्येकी रू. २७ लाख वार्षिक पॅकेजवर, तीन विद्यार्थ्यांची प्रत्येकी रू. २१ लाख, १६ लाख, ९ लाख तर ८ लाख वार्षिक पॅकेजवर नोकऱ्यांसाठी निवड झाली, असे एकुण नऊ विद्यार्थ्यी कंपनीने नोकरीसाठी निवडले, अशी माहिती संजीवनी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सचे कार्यकारी विश्वस्त अमित कोल्हे यांनी दिली.

पुढे म्हटले, राहुल कैलास जगधने, वैष्णवी सचिन मोहाडकर व प्रथमेश संतोष सोनवणे यांची वार्षिक पॅकेज रू. २७ लाखांवर निवड झाली. यशोदिप सुधिर भामरे, ज्ञानेश्वरी विजयराज डोळझाके व ऋषिकेश राजेंद्र वाबळे यांची वार्षिक पॅकेज रू.२१ लाखांवर, संकेत श्रीराम दवंगे याची रू १६ लाख, प्रणव विक्रमादित्य गाडे व विनित हर्षद जोशी यांची अनुक्रमे रू ९ लाख व रू ८ लाख वार्षिक पॅकेजवर निवड झाली.

अनेक उद्योगांना आधुनिक तंत्रज्ञान अवगत असलेले अभियंते मिळत नाही, तर अनेक अभियंत्यांना चांगल्या पगाराच्या नोकऱ्या मिळत नाही, हे वास्तव संस्थेचे संस्थापक, माजी मंत्री स्व. शंकरराव कोल्हे यांनी जाणले. ही विसंगती दुर करण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष नितिन कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली संजीवनी इंजिनिअरींग कॉलेजने शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासुन ऑटोनॉमस दर्जा प्राप्त केला आणि नामांकित उद्योगांना अभिप्रेत असलेल्या आधुनिक तंत्रज्ञानाचा समावेश अभ्यासक्रमात केला. त्याचा चांगला परिणाम प्लेसमेंटसाठी पहिल्या ऑटोनॉमस बॅचपासुन दिसत आहे. ग्रामीण भागातील मुलामुलींना सरकारी आस्थापना किंवा नामांकित कंपन्यांमध्ये चांगल्या पगाराच्या नोकऱ्या मिळाव्यात, काहींनी स्वतःचे उद्योग सुरू करून इतरांच्या हातांना काम द्यावे, या हेतुने सुमारे ४२ वर्षांपूर्वी संजीवनी शैक्षणिक संकुलाची स्थापना स्व. कोल्हे यांनी केली. त्यांची दूरदृष्टीता सातत्याने सिध्द होत आहे. संजीवनीचे अध्यक्ष नितिन कोल्हे व कार्यकारी विश्वस्त अमित कोल्हे यांनी सर्व निवड झालेल्या सर्व अभियंत्यांचे, पालकांचे अभिनंदन केले.



# गौरी शुगरचे नऊ लाख टन ऊस गाळप उद्दिष्ट; रोहीदास यादव यांची माहिती

**श्रीगोंदा | माधव बनसुडे**

ओंकार ग्रुपचे अध्यक्ष बाबुराव बोत्रेपाटील यांच्या हिरडगाव येथील गौरी शुगरने गळीत हंगाम २०२५-२६ करिता ९ लाख मे टन ऊसाचे गाळप करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे.

गौरी शुगर अँड डिस्टलरीजने ट्रक-ट्रॅक्टर जुगाड टायरगाडी व हार्वेस्टर मशीन यांचे तोडणी आणि वाहतुकीचे करार सुरू करण्यात आले, अशी माहिती कारखान्याचे व्यवस्थापक रोहीदास यादव यांनी दिली.

दोन दिवसात ४०० वाहन टोळी २५० ट्रॅक्टर जुगाड १०० टायर गाडी व दहा हार्वेस्टर मशीनचे करार झाले आहेत. मागील गळीत हंगामाप्रमाणे यावर्षी कारखाना व्यवस्थित चालून शेतकरी वाहतूकदार व कामगार यांना ऊसाच्या भावात न्याय देणार आहे. रोहीदास यादव यांनी तोडणी वाहतूकदार व कर्मचारी यांना करारासंदर्भात सूचना दिल्या व करार शुभारंभ केला सन २०२४-२५ चा गाळप हंगाम यशस्वीपणे पूर्ण करून ७,१५,४१९ मेट्रिक टनाचे गाळप करण्यामध्ये श्रीगोंदा, शिरूर, कर्जत, जामखेड, दौंड, आष्टी, करमाळा मधील ऊस उत्पादक शेतकरी बंधू ऊसतोडणी वाहतूक कंत्राटदार अधिकारी-कामगार बंधूनी बहुमोल सहकार्य केले आहे. यावेळी कारखान्याचे शेतकी अधिकारी व ऊसपुरवठा अधिकारी सर्व विभागाचे विभाग प्रमुख कर्मचारी तोडणी वाहतूक मुकादम मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुलांनो, मैदानात या

आजचे युग हे विज्ञान तंत्रज्ञानाचे युग समजले जाते. २१ व्या शतकातील विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगात स्मार्ट फोन, इंटरनेट हे प्रत्येकाच्या जीवनातील अविभाज्य घटक बनले. केवळ घरातील मोठ्या माणसांकडेच नव्हे तर शाळकरी मुलांकडे देखील मोबाईल फोन पाहायला मिळतो. कोरोनाकाळात ऑनलाइन शिक्षणासाठी पालकांनी घेऊन दिलेला मोबाईल अजूनही मुलांच्या हातात आहे. हाच मोबाईल आज मुलांचा सर्वात जवळचा सहकारी बनला. सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत मुले मोबाईललाच चिकटून बसलेली असतात.



आजच्या विज्ञान तंत्रज्ञान युगात मोबाईल हा गरजेचा आहे. तो गरजेपुरातच वापरला गेला पाहिजे, मात्र आज मुलांसाठी मोबाईल हेच सर्वस्व होऊन बसले. आजच्या मुलांना मोबाईलने भुरळ घातली आहे. दिवसातील पाच ते दहा तास मुले मोबाईल वरच असल्याने मुलांची शारीरिक व बौद्धिक वाढ खुंटत चालली आहे, त्यामुळे मुलांचे बालपण हरवत चालले की काय अशी शंका मनात येते. आजची मुले जास्त प्रमाणात टीव्ही, संगणक, मोबाईल, इंटरनेट, व्हिडीओ गेम, व्हाट्सअप, फेसबुक, इंस्टाग्राम यासारख्या सोशल मीडियात दंग असतात. तंत्रज्ञानरुपी राक्षसाने मुलांचे बालपणच खाऊन टाकलेय. पूर्वी शाळांना सुट्ट्या लागल्या की गावागावातील मैदाने मुलांनी भरून गेलेली असायची पण आज ती मैदाने विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगात ओस पडली असल्याचे चित्र पाहायला मिळते. क्रिकेट वगळता एकही मैदानी खेळ खेळताना मुले दिसत नाहीत.

देशी खेळ तर आजच्या मुलांना माहीतच नाहीत. गोट्या, भोवरे, विटीदांडू खेळताना कोणी दिसत नाही. आट्यापाट्या आणि सुरपारंब्या या खेळाचे नियम तर सोडाच पण नावही आजच्या मुलांना माहीत नाही. मोठे रिंगण घेऊन त्यात गोट्यांचा डाव लावल्याचे चित्र आज पाहायला मिळत नाही. गलगुट करून खेळणे व त्यावर राज्य द्यावे लागल्याचे हल्लीच्या मुलांमध्ये ऐकिवातही नाही. भोवऱ्याच्या रिंगणाचीही तीच अवस्था. दगडावर आरी घासून भोवऱ्याला टोक करीत बसलेला मुलगा शोधूनही सापडेनासा झाला आहे. जुन्या कपड्यांचा चेंडू तयार करून खेळला जाणारा रप्पाधप्पीचा खेळ हल्लीच्या मुलांना माहीतही नाही. लपंडाव, विटीदांडू, लगोरी, कुरघोडी, चंफूल, उडाणटप्पू हे खेळ आता दुर्मिळ झाले आहेत. लंगडी हा खेळ आता फक्त शाळेतील पिटीच्या तासापूरता उरला आहे. या खेळांमुळे मुलांचा शारीरिक व्यायाम व्हायचा शिवाय संघभावना, एकी, आपुलकी, नेतृत्व हे गुण या खेळांमुळे मुलांमध्ये विकसित व्हायचे.

या खेळाची जागा आता टीव्ही, संगणक, मोबाईल व्हिडीओ गेम यांनी घेतली. टीव्ही, संगणक, व्हिडीओ गेममुळे मुलांना विविध खेळांची माहिती उपलब्ध होऊन त्यातून मुलांचा बौद्धिक विकास होतो, असे वाटत असले तरी त्यांचा शारीरिक विकास खुंटत चालला आहे. याचा समाजातील सर्व घटकांनी गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. मुलांना पुन्हा मैदानाकडे आणण्याची जबाबदारी पालक, शिक्षक व समाजातील सर्वच घटकांची आहे.



**श्याम बसप्पा ठाणेदार**
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

**समाजसंवाद**

# जीवापाड : आशयसंपन्न कथांचा हृदयस्पर्शी फराळ

## गणेश आटकळे यांचे कथालेखन
## वाचकांच्या मनाचा ठाव घेणारे प्राजक्त प्रकाशनचे नवे पुस्तक




**गणेश वेल्हाळे**
पंढरपुर

**ग्रंथपरिचय**

जीवापाड वाचायला घेतलं... आणि खाली ठेवावंसं वाटलंच नाही. गणेश आटकळे यांच्या 'जीवापाड' या कथासंग्रहाने अल्पावधीत वाचकांच्या मनात एक खास स्थान निर्माण केले आहे. लेखकाला पुरस्कार मिळाल्याची बातमी ऐकल्यानंतर मी हे पुस्तक ऑनलाईन मागवले, पण रोजच्या व्यापात वाचणे थांबून गेले होते. मात्र रविवारी हातात घेतलेले पुस्तक खाली ठेवावेसे वाटलेच नाही. हे वाचन एक अनुभव बनून गेले.

जीवापाड मधील कथा म्हणजे केवळ शब्दांचा गोफ नव्हे, तर भावनांचा कल्लोळ आहे. या कथा देशभक्ती, कर्तव्यनिष्ठा, सामाजिक जाणिवा, ग्रामीण जीवन आणि मानवी नातेसंबंधांची सुरेख गुंफण दर्शवतात. 'जीवापाड' आणि 'विरह' या कथा वाचताना डोळ्यांत काजळ दाटून येतो. 'कुस्ती' आणि 'पुढारी' या कथांमधून खेड्यापाड्यांतील जगण्याचे रेखीव चित्रण दिसून येते. कथांमधून उमटणारे प्रश्न... आपल्या जवळची सगळी माणसं, खरोखर आपल्या असतात का?'' हा प्रश्न 'पत्र' या कथेतून मनात ठसतो. 'परी' ही कथा बालमनाचा चटका लावणारा अनुभव देऊन जाते. 'कर्मवीर' ही कथा कार्यमग्नतेचा मानवी स्पर्श देते, तर 'कथा नावाची कथा' या मजेशीर कथेमध्ये लेखकाचे विनोदी अनुभव हास्य फुलवतात. 'बीफ' ही कथा तर धर्मकारण, राजकारण आणि सामाजिक वास्तवावर अंतर्मुख करणारी ठरते. लेखकाची लेखनशैली सोपी, पण प्रभावी. गणेश आटकळे यांच्या लेखनशैलीचं खास वैशिष्ट्य म्हणजे, त्यांनी कोणताही दुरावट शब्दप्रपंच न करता साध्या, सोप्या, पण नेमक्या शब्दांत कथा मांडल्या आहेत. म्हणूनच वाचकांना त्या कथांमधील भावनिक क्षण जिवंत वाटतात. या कथा थरार देतात, हास्य निर्माण करतात आणि डोळ्यांत नकळत पाणी आणतात. त्यामुळेच जीवापाड या संग्रहातील कथा प्रत्येकाने वाचाव्यात अशाच आहेत. ''साध्या शब्दांतून लेखकाने कथा हृदयापर्यंत नेल्या आहेत.




लेखन प्रामाणिक आणि अंतःकरणातून आलेले वाटते. तुमचे सध्या वाचन काय सुरु आहे? एकदा जीवापाड वाचा, तुम्हीही हरवून जाल त्या कथांमध्ये.

*पुस्तकाचे नाव : जीवापाड*
*लेखक : गणेश आटकळे*
*प्रकाशन : प्राजक्त प्रकाशन, पुणे*
*संपर्क : ९८९०९५६६९५*
*भाषा : मराठी*
*प्रकार : कथासंग्रह (भावनाप्रधान, सामाजिक, ग्रामीण)*

# आरक्षण उपवर्गीकरण: कोण कुणाला फसवतंय?

मुंबईमध्ये ५९ अनुसूचित जातींपैकी एक जात असलेल्या सकल मातंग समाजाच्या वतीने २० मे रोजी आरक्षण उपवर्गीकरणाच्या अंमलबजावणीसाठी मोर्चा आयोजित केला जात आहे. परंतु, ज्यांनी महाराष्ट्रभर मोठमोठे मेळावे घेतले, प्रचार केला, आणि ''महायुती''ला सत्तेवर आणण्यात मोठा वाटा उचलला, त्यांना आता ''महायुती''कडून उपवर्गीकरण निर्णयाची अंमलबजावणीसाठी मोर्चा काढावा लागत असल्याचा अर्थ काय? शासनाने त्यांची फसवणूक केली आहे का? की ''महायुती''ने फक्त समाजाचा वापर केला आहे? सर्वोच्च न्यायालयाने १ ऑगस्ट २०२४ रोजी उपवर्गीकरणाचा निकाल दिल्यानंतर काही पुढाऱ्यांचे अपेक्षाभंग झाल्याचे दिसून येते. या घटनाक्रमातून सामान्य कार्यकर्त्यांनी काय शिकावे, ते महत्त्वाचे आहे. १) भाजपाचा सामाजिक न्याय प्रश्नाकडे दुर्लक्ष. जर भाजपा सामाजिक न्यायाच्या विरोधात असती, तर उपवर्गीकरणाचा प्रश्न सोडविला असता. पण त्यांनी मराठा, ओबीसी, आदिवासी व धनगर यांचे आरक्षण प्रश्न अजूनही सोडवलेले नाही. सर्वोच्च न्यायालयाने उपवर्गीकरणाचा निकाल दिला, त्यात भाजपाचा काही वाटा नाही. काही संघटना व फुले-आंबेडकरी अभ्यासकांनीच हा प्रश्न हाताळला आहे. भाजपाचे योगदान नसले तरी, निवडणूक जवळ आल्यावर उपवर्गीकरणासाठी पुढाऱ्यांचा उदय झाला आहे. २) सहमती नसल्यामुळे प्रश्न धुमसतोय. सामाजिक न्यायासाठी उपवर्गीकरण आवश्यक आहे, यात कोणी शंका नाही. पण कसे करायचे यावर एकमत नसल्यामुळे प्रश्न गुंतागुंतीत आहे. त्यामुळे सामाजिक तणाव वाढतोय आणि याचा फायदा भाजपा घेत आहे. एक जात विरोध करत आहे, दुसरी विरोधक संघटना आहे. हे राजकारण आणि त्यामागील हितसंबंध सर्वांना माहीत आहेत. ३) सामाजिक न्यायाच्या महत्त्वाच्या मुद्यांवर आवाज कोणी उठवतो? आरक्षण उपवर्गीकरणासाठी आंदोलन करणाऱ्यांनी दलितांच्या खरी गरजा विसरल्या आहेत - मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती, समाजकल्याण निधी, पदोन्नतीतील आरक्षण, आर्थिक निधी कपात, आंतरजातीय विवाह योजना बंद होणे, जमिनीवरील हक्कांचा प्रश्न, घरकुल समस्या आणि दलितांवर वाढलेले अत्याचार याबाबत आवाज कधी उठविला? हेच खरे सामाजिक न्याय आहे का? ४) ५९ जातींपैकी एकच जात का आंदोलन करत आहे? उपवर्गीकरणाचा प्रश्न ५९ जातींशी संबंधित आहे, पण एक जातच सक्रीय आहे. इतर जाती का सहभागी होत नाहीत? त्यांच्याशी संवाद झाला आहे का? त्यांचे स्थान काय आहे? अभ्यासकांनी संपूर्ण अभ्यास करून हे प्रश्न ठोस करायला हवेत. ५) आर्थिक नवउदारीकरण आणि खाजगीकरणाचा प्रश्न का चुकतो? शासनाच्या आर्थिक नवउदारीकरणामुळे शिक्षण व नोकऱ्यांचे खाजगीकरण होत आहे, ज्यामुळे आरक्षित नोकऱ्यांमध्ये कपात होते. आरक्षण वाटप जणू भाकरी वाटपाप्रमाणे झालं आहे, पण भाकरी टोपल्यातच ठेवायची, अशी दक्षता कुणी घेतली नाही. कल्याणकारी अर्थव्यवस्था गरजेची आहे; त्यासाठी आंदोलन कधी झाले? ६) उपवर्गीकरणाचा प्रश्न संकुचित केला जातोय. उपवर्गीकरणाचा निकाल सर्व अनुसूचित जातींसाठी आहे, पण काही पुढाऱ्यांनी जातीय मर्यादेत अडकवून तो प्रश्न विकृत केला आहे. ७) शासनाची समितीवर विश्वास नाही का? न्यायालयीन निकालानंतर तातडीने समिती गठीत झाली आहे आणि मुदतवाढ दिली गेली आहे. नेत्यांना त्या समितीवर विश्वास नाही का? की शासन वेळकाढूपणा करत आहे? हे का लपवत आहेत? ८) काही नेत्यांना पुनर्वसनाची आश्वासने? काही नेत्यांना पुनर्वसनासाठी आश्वासने देऊन खेळवलं जात असल्याचा संशय आहे. आरक्षण उपवर्गीकरणाचा निकाल असूनही अनेक गुंतागुंत आहेत. त्यामुळे सर्व जातीय दलितांना संतुष्ट करणारा तोडगा एकत्रित चर्चेतूनच निघू शकतो. अनेक कार्यकर्ते, अभ्यासक, नेते असूनही काही ठराविक लोकच या ओझ्याखाली आहेत; याचा विचार करणे गरजेचे आहे.



**कॉ. महादेव खुडे**
नाशिक

**समाजवार्ता**

# आंबीच्या उपसरपंचपदी उज्वला डुकरे

**राहुरी । संदीप पलांडे**

तालुक्यातील राजकीयदृष्ट्या महत्वाच्या असललेल्या आंबी ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी प्रगतीशील शेतकरी उज्वला सुभाष डुकरे यांची सदस्य मंडळाच्या बैठकीत बिनविरोध निवड करण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी सरपंच संगिता साळुंके होत्या.



यावेळी डॉ. तनपुरे सहकारी साखर कारखान्याचे माजी संचालक शिवाजीराव कोळसे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक वसंतराव कोळसे, देखरेख संघाचे माजी अध्यक्ष भागवतराव कोळसे, माजी सरपंच हरिश्चद्र साळुंके, माजी उपसरपंच विजय डुकरे, पंकजभाऊ कोळसे, मंगल जाधव, बाळासाहेब साळुंके, धनगर समाज संघर्ष समितीचे अध्यक्ष जालींदर रोडे, गोरक्षनाथ डुकरे, बाळासाहेब डुकरे, माजी सरपंच सतिश पाटील जाधव, गिताराम डुकरे, बापूराव डुकरे, पोपटराव डुकरे, राहुल डुकरे, महेश कोळसे, रविंद्र कोळसे, डॉ. अजित सालबंदे, माजी सरपंच रंगनाथ साळुंके, सुनिल लोंढे, शंकरराव डुकरे, अंमळनेर उपसरपंच किरण कोळसे, नरेंद्र डुकरे, दत्तात्रय कोळसे, चंद्रकांत डुकरे, प्रकाश टाकसाळ, सर्जे राव डुकरे, जर्नाधन डुकरे, प्रविण डुकरे, नानासाहेक डुकरे, जालींदर डुकरे, ज्ञानेश्वर डुकरे, ज्ञानदेव डुकरे, प्रकाश डुकरे, अर्जुन डुकरे, विठ्ठल सो. कोळसे, नाना कोळसे, व्हाय चेअरमन योगेश डुकरे, सदस्य संदीप साळुंके, गणेश कोळसे, स्मिता लोंढे, रावसाहेब फ लमाळी, भिमराव कोळसे, सुभाष डुकरे, ग्रामसेवक बाबासाहेब भोसले, श्रीहरी साळुंके, प्रशांत चव्हाण, पत्रकार विश्वनाथ जाधव यांचेसह आदि ग्रामस्थ उपस्थीत होते. नूतन उपसपंच डुकरे यांचा प्रमुख मान्यवर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. नूतन उपसरपंच यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# तिरंगा यात्रेच्या माध्यमातून आमदार राजळेंची वातावरणनिर्मिती

## विरोधकांच्या पातळीवर मात्र अद्यापही सामसूमच!

**राजेंद्र देवढे । विशेष प्रतिनिधी**



भारत- पाकिस्तान युद्धानंतर तापलेले वातावरण टिकवून ठेवण्यासाठी भाजपाने देशभर तिरंगा यात्रा आयोजित केल्या आहेत. त्यानुसार, आमदार मोनिका राजळे यांनी पाथर्डी शहरात तिरंगा यात्रा आयोजित करून वातावरणनिर्मिती करण्यात आघाडी घेतली आहे. आयते मुद्दे हाती असतानाही विरोधकांच्या पातळीवर मात्र अद्यापही सामसूमच आहे. भारत-पाकिस्तान युद्धात अमेरिकेचा हस्तक्षेप, कर्नल सोफिया कुरेशींबाबत मंत्री विजय शहा यांचे वादग्रस्त वक्तव्य आणि हरियाणाची युट्यूब ब्लॉगर ज्योती मल्होत्रा हिला पाकिस्तानसाठी केलेल्या हेरगिरीवरून झालेली अटक - यासारखे अनेक मुद्दे हाताशी असूनही विरोधकांनी साधा निषेधही नोंदवला नाही. यावरून, चतुरस्त्र विरोधकांचा अभाव ही आमदार राजळेंच्या जमेची बाजू ठळकपणे पुन्हा एकदा समोर आली आहे. वास्तविक पाहता वैयक्तिक आमदार राजळेंच्या नाही तर भाजपाच्या विरोधात रान पेटविण्याची मोठी संधी विरोधकांना चालून आली होती.

परंतु, ती त्यांनी दवडली. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर कार्यकर्ते संघटीत करण्यासाठी ही उत्तम संधी असूनही, विरोधकांनी हलगर्जीपणा केला. त्यामुळे, विरोधकांकडे असलेला समयसूचकतेचा अभावही समोर आला. पक्षीय पातळीवरील कार्यक्रम असोत किंवा लोकसंपर्कसाधण्यासाठी स्थानिक पातळीवरील औचित्य असो - आमदार मोनिका राजळे ते बरोबर साधतात. त्यांच्या ठायी असलेली तत्परता व सातत्य, या त्यांच्या जमेच्या बाजू आहेत. याच बळावर त्या प्रत्येक निवडणुकीत विरोधकांना वरचढ ठरत आल्याचा अनुभव अनेकदा आला आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांना अजून काहीसा विलंब असला तरी त्यांच्या गोटात कार्यकत्यांची रेलचेल आहे. असं असूनही स्लो बट स्टेडी या लोकप्रवादाचं त्या तंतोतंत पालन करतात. याउलट विरोधकांकडे प्रभावी मुद्दे असूनही ते हलगर्जीपणा करत असल्याचं वारंवार दिसून येत आहे. राष्ट्रीय पातळीवरील प्रश्नांसह, स्थानिक पातळीवरील मुद्दे हाताशी असूनही विरोधक त्यांचा फायदा घेत नाहीत. विरोधकांची ही निष्क्रियताच खऱ्या अर्थाने आमदार मोनिका राजळे यांच्या जमेची बाजू आहे.



# लग्नातले 'स्टेजवरील स्वागत': प्रतिष्ठेचे की अपमानाचे?

## केवळ काही 'महत्त्वाच्या' लोकांचे स्वागत करून उरलेल्या वऱ्हाडी मंडळींचा अनाहूत अवमान?

**आप्तसंवाद । इंजि. भुषण ताकटे**

अलीकडे विवाह समारंभ म्हणजे केवळ दोन व्यक्तींचा नाही, तर दोन कुटुंबांचा सांस्कृतिक संगम असतो. परंतु या समारंभांमध्ये एक विचित्र प्रथा वाढताना दिसते ती म्हणजे मंचावरून काही निवडक, श्रीमंत वा 'प्रमुख' पाहुण्यांचे स्वागत आणि उरलेल्या सर्व नातेवाईक, आप्तेष्ट, मित्रपरिवाराचा अनुल्लेख.

इंजि. भूषण ताकटे यांनी ही प्रथा रोखठोकपणे उघडकीस आणली.



ते म्हणतात, ''लग्नकार्यात उपस्थित असलेल्या काही मोजक्या श्रीमंत, पुढाऱ्यांचे मंचावरून नाव घेऊन स्वागत केल्याने उरलेल्या पाहुण्यांचा अप्रत्यक्ष अवमान होतो. निमंत्रण स्वीकारून, वेळेवर आलेल्या सर्वच समाजबांधवांना सारखं मान देणं हेच खरी संस्कृती आहे.'' ताकटे पुढे सांगतात, ''विवाह समारंभात आलेले पाहुणे, मग ते कुणीही असो,

वधू-वराला आशीर्वाद देण्यासाठी येतात. तेव्हा कोणाच्या नावाचा उच्चार होतो किंवा नाही याने त्यांच्या सौजन्याला दुय्यम स्थान देणं चुकीचं आहे.'' त्यामुळे अशा विभाजनात्मक प्रथांना आता विराम दिला पाहिजे, हे ठळकपणे जाणवते. विवाह म्हणजे सामूहिक आनंदाचा सोहळा. त्यात 'कोण वर' आणि 'कोण खाली' असा भेद का हवा? विवाह समारंभातील समता टिकवण्यासाठी ५ सुचवलेल्या गोष्टी. सर्व पाहुण्यांचे सामूहिक स्वागत करावे. स्टेजवर स्वागताचे कार्यक्रम टाळावेत. वधू-वरांची ओळख आणि विधींचा वेळ जाहीर करावा. उपस्थित पाहुण्यांना समर्पक बैठकीची व्यवस्था द्यावी. स्मृतीचिन्हे देताना समानता पाळावी.

# अलमट्टी उंचीवाढ विरोधी लढ्याला गती- आ. पाटील

**कोल्हापूर । प्रतिनिधी**

अलमट्टी धरणाच्या उंचीवाढीविरोधात शेतकरी, पुरबाधित नागरिक आणि सर्वपक्षीय संघर्ष समितीने आयोजित केलेल्या चक्काजाम आंदोलनाच्या पहिल्या टप्प्यास उल्लेखनीय यश लाभले आहे. हजारोंच्या संख्येने नागरिकांनी या आंदोलनात सहभागी होत सरकारच्या धोरणाविरोधात ठाम आवाज उठवला, अशी माहिती आ. सतेज पाटील यांनी दिली. ते पुढे म्हणाले, या जनआंदोलनाची दखल घेत राज्य सरकारने यावर चर्चा करण्यासाठी ता.२१ मे २०२५ रोजी मुंबईत विशेष बैठक आयोजित केली. या बैठकीसाठी सर्वपक्षीय संघर्ष समितीच्या प्रतिनिधींना चर्चेसाठी बोलावण्यात आले असून, ही बैठक पुढील लढ्याच्या दृष्टीने एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. राज्य शासनाने आमची भुमिका कणखरपणे केंद्रासमोर मांडावी हीच अपेक्षा आहे.